**नियमित फौजदारी खटला क्रं. १२६९/२०२२.**
**नि.क्रं. ६**

## न्या य नि र्ण य

( दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ रोजी घोषित )

१. आरोपी शैलेश धर्मराज कोळी यांचे विरुद्ध प्रस्तुतचे दोषारोपपत्र पनवेल लोहमार्ग पोलीस यांनी भारतीय दंड संहिता कलम ३७९ प्रमाणे दाखल केलेले आहे.आरोपीला आज रोजी न्यायालयात जेलमधून व्ही.सी. व्दारे हजर केले असता त्याने स्वत:हून गुन्हा कबूल केला आहे. त्याप्रमाणे नि. ४ कडे दोषारोप ठेवला. आरोपीने स्वत:हून गुन्हा कबूल केला तसे निवेदन नि. ५ कडे दिले. आरोपीने स्वखुशीने गुन्हा कबूली केल्याबाबत मी खात्री केली. तसेच आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले.

२. आरोपीने फिर्यादीचा मोबाईल चोरी केली आहे. तसेच, रेल्वे स्थानक परिसरात आणि चालत्या रेल्वेमध्ये वारंवार घडत असलेल्या मौल्यवान वस्तुंच्या चो—यांमुळे निष्पाप प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येत आहे, ही बाब न्यायीक नोंद घ ेण्यासारखी आहे. त्यामुळे त्याला अपराधी परिविक्षा अधिनियमातील तरतूदींचा लाभ देणे योग्य होणार नाही. आरोपीने असे कथन केले की, त्याचे कुटुंबीय त्याचेवर अवलंबून आहे, शिवाय त्याने स्वत:हून गुन्हा कबुल केला आहे. आरोपी हा दिनांक २४.०८.२०२२ पासून आजपर्यंत कारागृहात आहे. सदरचा गुन्हा हा आरोपीचा दुसरा गुन्हा आहे. सदर गुन्हयासाठी होणा—या शिक्षेबाबत आरोपीला सांगण्यात आले, त्यानंतरही त्याने सदरचा गुन्हा कबूल असल्याबाबत सांगितले. यासर्व कारणांचा विचार करता व त्याचा सदरचा दुसरा गुन्हा असल्याने त्याला भारतीय दंड संहिता कलम ३७९ साठी ०१ महिना २५ दिवस सक्त मजूरी कारावासाची शिक्षा पुरेसे आहे. यास्तव आदेश :

## आ दे श

१. आरोपी शैलेश धर्मराज कोळी याला भारतीय दंड संहिता कलम ३७९ प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४१ अन्वये दोषी ठरविण्यात येते.

२. आरोपीला भारतीय दंड संहिता कलम ३७९ साठी ०१ महिना २५ दिवस सक्त मजूरी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

३. आरोपीला नियमित फौजदारी खटला क्र. १२४१/२२ मध्ये भारतीय दंड संहिता कलम ३७९ साठी ०१ महिना २३ दिवस सक्त मजूरी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

४. आरोपीने न्यायालयीन बंदी असतांना जेवढी शिक्षा भोगली तेवढया कालावधीची आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे सुट देण्यात येते.

५. निकालपत्राची छायांकीत प्रत विनामुल्य त्वरीत आरोपीला देण्यात यावी.

६. जप्त मुद्देमाल खबरदेणार यांना सुपूर्दनाम्यान्वये परत करण्यत आलेला आहे, तो त्यांनी त्यांच्याकडेच ठेवावा व अपील कालावधीनंतर सुपूर्दनाम्यातील अटी व शर्ती रद्द करण्यात येतील.

७. आरोपीने हया प्रकरणात मिळालेली शिक्षा उपरोक्त नमूद प्रकरण क्र. १२४१/२२ मधील शिक्षेसोबत भोगायची आहे.

Swayam Shailendrakumar Chopda
Digitally signed by Swayam Shailendrakumar Chopda
Date: 2022.10.19 01:16:32 +0530

कल्याण.

(स्वयंम एस. चोपडा )
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, कल्याण.

दिनांक :— १७.१०.२०२२.